ePaper


## सरनाईकांच्या घोटाळ्यात उद्धव ठाकरेंची 'पार्टनरशीप':सोमय्या



वर्ष - 6 । अंक -259 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार | दि. 2 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


**आतील पानांत**

- "पेशवाईचा वसा आणि वारसा चालविणारे लोक सरकारमध्ये
- कोरेगाव भीमा येथे लोटला जनसागर!
- इगतपुरीमधील कंपनीला भीषण आग


# स्मार्ट नव्हे; क्राईम सिटी?

## अज्ञात आरोपींकडून पिंपरी-चिंचवडमध्ये 15 ते 20 वाहनांची तोडफोड

**।पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहरामधील पिंपळे सौदागर आणि राहटणी परिसरात अज्ञात टोळक्याने 15 ते 20 वाहनांची तोडफोड केली आहे. कोयते आणि सिमेंटच्या गट्टूनी वाहनांची तोडफोड केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. टोळक्याला अडवण्यासाठी गेलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला अज्ञातांनी धक्काबुकी केली असून ते रिक्षातून फरार झाले आहेत. या घटनेने नव वर्षाच्या पहिल्याच दिवशी शहरात दहशत पसरली आहे. दिवसेंदिवस अशा प्रकारची गुन्हेगारी वाढत आहे. पिंपरी-चिंचवड स्मार्टसिटी म्हणून ओळखली जात असताना अशा प्रकारच्या प्रकारांमुळे स्मार्ट सिटी की क्राईम सिटी असे म्हणल्यास वावगे ठरू नये.

नूतन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पिंपरी- चिंचवड शहरातील गुन्हेगारीने डोकं वर काढलं आहे. सांगवी आणि वाकड पोलीस ठाण्याची हद्द असलेल्या राहटणी आणि पिंपळे सौदागर येथे मध्यरात्री एकूण 15 ते 20 वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली आहे. शनिवारी 31 डिसेंबर असल्याने शहरात दीड हजारापेक्षा जास्त पोलिस बंदोबस्त होता. तरी देखील अज्ञात चार ते पाच जणांच्या टोळक्याने रिक्षातून येऊन दिसेल त्या दुचाकी, चारचाकी ला लक्ष करत कोयत्याने आणि सिमेंटच्या गट्टूने वाहनांची तोडफोड केली आहे.

तोडफोड करणाऱ्या टोळक्याला पकडण्याचा प्रयत्न वाकड पोलीस कर्मचाऱ्याने केला पण त्यांना धक्काबुकी करून अज्ञात तोडफोड करणारे व्यक्ती पसार झाले आहेत.(PIMPRI NEWS) याबाबत सांगवी आणि वाकड पोलिस अधिक तपास करत आहेत.



4 ते 5 तरुणांनी रिक्षातून फिरून पिंपळे सौदागर व राहटणी मधील विविध भागात 50 ते 60 गाड्यांच्या काचा फोडून नव वर्षाच्या पहिल्या दिवशी दहशत माजवली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नेमक्या किती वाहनांच्या काचा फोडल्या याचा आकडा पोलिसांनी सांगितला नाही. पण प्राथमिक तपासात 15 ते 20 वाहनांच्या काचांची तोडफोड केली असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तसेच पुढील तपास चालू असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

पिंपरी-चिंचवड परिमंडळ 2 चे उप आयुक्त, काकासाहेब डोळे म्हणाले की, या प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर पकडण्यात येईल व त्यांना कठोर शिक्षा केली जाईल.

वाकडचे सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीकांत देसले म्हणाले की, "ही घटना आज पहाटे 2 वा च्या सुमारास घडली आहे.10 ते 15 मिनिटात आरोपी सुसाट रिक्षात फिरले व विविध भागात रस्त्याचे कडेला असलेल्या गाड्यांच्या काचांची तोडफोड केली आहे. त्यांनी वाकड पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये मध्ये 10 ते 15 वाहनांच्या काचा फोडल्या आहेत तर सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पाच ते सहा वाहनांच्या काचा फोडल्या आहेत. राहटणी फाट्या जवळील गोडांबे कॉर्नर जवळ पेट्रोलिंग करणाऱ्या हवालदार रावते यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला.

### पोलिसांचा वचक राहिला नाही...

पोलिसांनी पाठलाग केला तेव्हा त्यांनी रिक्षा कासरवाडी स्मशानभूमी जवळ सोडून पळून गेले." 'सी सी टी व्ही फुटेजच्या आधारे पोलीस त्या तरुणांचा शोध घेत आहे. त्या तरुणांनी सिमेंटचे गट्टू फेकून रस्त्याच्या कडेला रात्री पार्क केलेल्या वाहनांच्या काचा फोडल्या आहेत. या वाहनांमध्ये बस, रिक्षा, टेम्पो व कार यांचा समावेश आहे. त्यांनी कोणत्याही नागरिकाला जखमी केले नाही", असे देसले म्हणाले. याबाबत माहिती देताना, सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव म्हणाले की 31 डिसेंबर व 1 जानेवारी च्या रात्री पुर्ण पिंपरी चिंचवड शहरात बंदोबस्त व नाकाबंदी होती. तरीही या गावगुंडांनी पिंपळे सौदागर व राहटणी मधील विविध भागात 50 ते 60 गाड्यांच्या काचा फोडून दहशत माजवली. पोलिसांचा वचक राहिला नसल्याने हे प्रकार घडत आहेत." जाधव पुढे म्हणाले की, "आज पहाटे 2 वा ते 2.30 वा चे दरम्यान 4 ते 5 तरुण रिक्षाने फिरून पिंपळे सौदागर व राहटणी मधील विविध भागात 50 ते 60 गाड्यांच्या काचा फोडून नव वर्षाच्या पहिल्या दिवशी दहशत पसरवत होते. ही रिक्षा चोरीची होती व मालकाने रिक्षा चोरी प्रकरणी तक्रारही पोलिसांकडे यापूर्वीच दाखल केली होती. रहाटणी फाटा येथून ही रिक्षा पुढे जात असताना त्या तरुणांनी रोडच्या कडेला पार्क केलेल्या कार व रिक्षा यांच्या काचा फोडल्या.

## पिंपरी पालिका भाजपच्या हातीच सुरक्षितः आमदार महेश लांडगे यांचा दावा

### केलेल्या विकासकामांची माहिती शहरवासीयांपर्यंत पोहोचवण्याचे काम करा

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी महापालिका भाजपच्या हातात सुरक्षित आहे, हे पाच वर्षातील भाजपचा कारभार पाहून शहरवासीयांना पटले आहे. विरोधकांच्या टीकेकडे लक्ष देऊ नका, आपण पालिकेच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांची माहिती शहरवासीयांपर्यंत पोहोचवण्याचे काम करा, असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी पक्षकार्यकर्त्यांना केले.

पिंपरी-चिंचवडमधील प्राधिकरण बांधितांच्या साडेबारा टक्के परताव्याचा प्रश्न तसेच शास्तीकर पूर्णमाफीचा निर्णय होण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार महेश लांडगे यांचा शहर भाजपाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. आमदार उमा खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेवक मधू जोशी, एकनाथ पवार, शत्रुघ्न काटे, चंद्रकांत नखाते, संदिप कस्पटे, हर्षल ढोरे, शशिकांत कदम, कैलास कुटे, अमोल थोरात, राजू दुर्गे, विजय फुगे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

लांडगे म्हणाले, की भाजप परिवाराने केलेला हा सन्मान जबाबदारी वाढवणारा आहे. शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लागत आहेत, हे आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. आमदार खापरे म्हणाल्या, की शास्तीकराच्या ओझ्यामुळे पिंपरी-चिंचवडकर वैतागले होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून व आमदार लांडगे यांच्या प्रयत्नाने शास्तीकराप्रमाणेच इतरही प्रलंबित विषय मार्गी लागले. सूत्रसंचालन मोरेश्वर शेडगे यांनी केले, तर, अनुप मोरे यांनी आभार मानले.

# “पेशवाईचा वारसा चालविणारे लोक सरकारमध्ये!

## सुषमा अंधारे यांची टीका



पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

विद्यमान राज्य सरकारमधील मंत्री या ठिकाणी अभिवादनाला येणे अपेक्षित नाही. कारण ज्या पेशवाईचा पाडाव म्हणून हा स्तंभ उभारला गेला आहे. त्याच पेशवाईचा वसा आणि वारसा चालविणारे लोक ज्या सरकारमध्ये बसले आहेत. ते इथे अभिवादन करायला येतील, ही अपेक्षाच नाही, अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. कोरेगाव भीमा ऐतिहासिक स्तंभाला अभिवादन केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना अंधारे म्हणाल्या, की नव्या वर्षाची सुरुवात एका उर्जादायी दिवसाने आणि अशा ऐतिहासिक स्थळाला अभिवादन करून केली. जातीयवाद, अन्याय, अत्याचार, विषमतावाद या विरोधात लढण्यासाठी आम्ही तयार आहोत. विद्यमान राज्य सरकारमधील मंत्री या ठिकाणी अभिवादनाला येणे अपेक्षित नाही. कारण ज्या पेशवाईचा पाडाव म्हणून हा स्तंभ उभारला गेला आहे. त्याच पेशवाईचा वसा आणि वारसा चालविणारे लोक ज्या सरकारमध्ये बसले आहेत. ते इथे अभिवादन करायला येतील, ही अपेक्षाच नाही.करणी सेनेसारख्या चिल्लर लोकांबद्दल मला काहीच बोलायचे नाही. मात्र, त्यांचे बोलविते धनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राज्यातील सत्ताधारी म्हणून भाजपमधील जबाबदार असणाऱ्या कोणत्याही एका प्रतिनिधीने या स्तंभाबद्दल वक्तव्य करून दाखवावे. मग आंबेडकरी जनता काय आहे?, ते दाखवले जाईल.बाकी करणी सेना वगैरे आमच्या खिजगणतीत नाहीत, असेही त्या म्हणाल्या.

स्तंभ परिसरातील सुविधांबद्दल अंधारे म्हणाल्या, की गेल्या वर्षीच्या तुलनेत येथे बऱ्यापैकी सुविधा आहेत. मात्र, पाच किलोमीटरपासून लोक अभिवादन करण्यासाठी चालत येत आहेत. कारण आणलेली वाहने तेथेच पार्क करावी लागतात. हजारो लोकांसाठी चार-पाच बस गाड्यांची सोय मला दिसली. त्यामुळे बस अपुऱ्या पडत आहेत. सुरक्षेच्या नावाखाली लोकांची गैरसोय चालवली आहे. कदाचित ही गैरसोय पाहून पुढच्या वर्षी लोकांनी अभिवादनासाठी येऊच नये, यावर तोडगा काढावा.

# नववर्षाच्या पहिल्याच दिवशी जुना पुणे-मुंबई महामार्ग जॅम!



**नूतन वर्षाचं औचित्य साधून घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांमुळं जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर वाहतूक कोंडी झाली आहे. लोणावळ्यातील कार्ला फाटा आणि सोमाटने फाटा येथे मोठी वाहतूक कोंडी झाली. कार्ला येथे आई एकवीरेच दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. तसेच शिरगाव येथील प्रतिशिर्डी साई बाबांच्या मंदिरात दर्शनासाठी रांग लागलेली आहे.**

# मिरची, ढोबळी मिरची, पावटा, तोतापुरी कैरीच्या दरात वाढ

## गुलटेकडी येथील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात राज्य; तसेच परराज्यांतून 100 ट्रक फळभाज्यांची आवक



। पुणे महाईन्यूज । प्रतिनिधी।

मार्केट यार्डातील घाऊक बाजारात मागणी वाढल्याने हिरवी मिरची, ढोबळी मिरची, पावटा, तोतापुरी कैरीच्या दरात वाढ झाली असून अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. गुलटेकडी येथील श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डात रविवारी (१ जानेवारी) राज्य; तसेच परराज्यांतून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक वाढली.

आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरातमधून मिळून १० ते १२ ट्रक हिरवी मिरची, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि गुजरातमधून मिळून १० ते १२ टेम्पो कोबी, राजस्थानातून ९ ते १० टेम्पो गाजर, पंजाब आणि मध्य प्रदेशातून मिळून २५ ते २६ टेम्पो मटार, गुजरातमधून २ टेम्पो भुईमूग शेंग, कर्नाटकातून १५० क्रेट्स (प्लास्टिक जाळी) तोतापुरी कैरी तसेच ३ ते ४ टेम्पो घेवडा, बंगळुरुतून २ टेम्पो आले, मध्य प्रदेश आणि गुजरातमधून मिळून ७ ते ८ ट्रक लसूण, आग्रा, इंदूर तसेच पुणे विभागातून मिळून ५० ट्रक बटाटा अशी आवक परराज्यांतून झाली, अशी माहिती घाऊक बाजारातील प्रमुख अडते विलास भुजबळ यांनी दिली.पुणे विभागातून सातारी आले ११०० ते १२०० गोणी, टोमॅटो ९ ते १० हजार पेटी, भेंडी ६ ते ७ टेम्पो, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, ढोबळी मिरची ७ ते ८ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, घेवडा ४ ते ५ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, कांदा १०० ट्रक अशी आवक झाली.

### मेथी, कांदापात, पुदिना, चवळईच्या दरात घट

**मार्केट यार्डातील तरकारी विभागात मेथी, कांदापात, पुदिना, चवळई या पालेभाज्यांच्या दरात घट झाली. कोथिंबिर, शेपू, चाकवत, करडई, अंबाडी, मुळा, चुका, पालक, हरभरा गड्डीचे दर स्थिर असल्याची माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. घाऊक बाजारात कोथिंबिरीच्या एक लाख २५ हजार जुडींची आवक झाली. मेथीच्या एक लाख जुडींची आवक झाली. कांदापात आणि चुक्याच्या दरात जुडीमागे २ रुपये, मेथी, पुदिना, चवळईच्या जुडीमागे एक रुपयांनी घट झाली. राजगिरा जुडीच्या दरात १ रुपयांनी वाढ झाली. अन्य पालेभाज्यांचे दर स्थिर होते.**

### लिंबू, अननस, खरबूज, सीताफळ, सफरचंद महाग

**मार्केट यार्डातील फळबाजारात लिंबू, अननस, खरबूज, सीताफळ, सफरचंदांच्या दरात वाढ झाली. पपईच्या दरात घट झाली. मोसंबी, डाळिंब, संत्री, कलिंगड, बोरे, चिकू, पेरुचे दर स्थिर आहेत. फळबाजारात केरळहून ५ ट्रक अननस, संत्री १ ते २ टन, मोसंबी २० ते २५ टन, डाळिंब १५ ते २० टन, पपई ८ ते १० टेम्पो, लिंबे तीन ते साडेतीन हजार गोणी, पेरु ७०० ते ८०० क्रेट्स (प्लास्टिक जाळी), कलिंगड ३ ते ४ टेम्पो, बोरे एक हजार ते १२०० गोणी, सीताफळ १० ते १२ टन अशी आवक झाली.**

# कोरेगाव भीमा येथे लोटला जनसागर!

## जिल्हाधिकाऱ्यांकडून अनुयायांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

पुणे ।
। महाईन्यूज ।



भीमा कोरेगाव (पेरणे) येथे जयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत आणि उत्साहात सुरु झाला.भीम अनुयायांनी अभिवादनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली आहे. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख आणि पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी वाहनतळावर आलेल्या अनुयायांशी संवाद साधला व गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले.

जयस्तंभ अभिवादनासाठी अनुयायांनी पहाटेपासून गर्दी केली होती. पोलीस प्रशासनाच्या उत्तम नियोजनमुळे अभिवादन सोहळा शिस्तीत सुरु आहे. पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी सोहळा शांततेत पार पडावा यासाठी नियंत्रण कक्षाद्वारे सीसीटीव्हीच्या माध्यमातून सर्व व्यवस्थेवर लक्ष ठेऊन आहेत. जिल्हा परिषदेने पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेची चांगली सुविधा केली असून आरोग्य पथकाद्वारे गरजूंना सेवा देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी स्वतः परिसराला भेट देऊन या सर्व व्यवस्थेची पाहणी केली. पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनीही भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. पीएमपीएमएलने लोणीकंद आणि कोरेगाव भीमा अशा दोन्ही बाजूने प्रत्येकी 140 बसेस सुरू ठेवल्या असून बसेसच्या सकाळी 11 वाजेपर्यंत सुमारे 2 हजार 800 फेऱ्या झाल्याची माहिती पीएमपीएमएलचे व्यवस्थापक दत्तात्रय झेंडे यांनी दिली आहे.

विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाचे नियोजन करण्याची जबाबदारी राज्य शासनाने समाज कल्याण विभागाकडे सोपवली आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणाची तयारी केली आहे. गृह विभागाने विविध सूचना निर्गमित केल्या नुसार कार्यक्रम सुरु आहे. डॉ. नारनवरे यांनी येणाऱ्या सर्व अनुयायांना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. 1 जानेवारी 2018 रोजी कोरेगाव भीमा परिसरात झालेल्या हिंसाचारात एकाचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. तेव्हापासून दरवर्षी जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा या परिसरात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कडक पावले उचलत आहेत.

### शौर्यदिनानिमित्त मोठी गर्दी

दरम्यान, शौर्यदिनानिमित्त मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मिळेल त्या गाडीने अनुयायांनी कोरेगाव येथे दाखल होत आहे. अनेकांनी घरुन आणलेला डबा जागा मिळेल त्याठिकाणी खात आहेत. आणलेली शिदोरी खात अनेक अनुयायी दिसत आहे. औरंगाबाद वरुन अनेक लोक दाखल झाले आहेत. नवीन वर्षाची सुरुवात चांगली झाली पाहिजे. कोरेगाव भीमा या ठिकाणी रिपब्लिकन सेनेच्यावतीने वादळ वारा हा भीम गीतांचा कार्यक्रम ठेवण्यात आला. भीम शाहीर मेघानंद जाधव यांनी भीम गीत सादर केली.

### 205 वा शौर्यदिन साजरा

**पुणे जिल्ह्याच्या पेरणे (ता. हवेली) येथील कोरेगाव भीमा येथे आज 205 वा शौर्यदिन साजरा होत आहे. मध्यरात्री 12 वाजता फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. सामूहिक बुध्द वंदना पठन करून शौर्यदिनाला सुरुवात झाली. मध्यरात्री पासूनच विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केलीये. भारतीय बौद्ध महासभा सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. ज्येष्ठ नेते प्रकाश आंबेडकर, सचिन खरात यांनी विजयस्तंभाला अभिवादन केले. समता सैनिक दल, महार बटालियन सेवानिवृत्त सैनिकांकडून सलामी आणि मानवंदना देण्यात आली. सकाळी 8 वाजल्यापासून सर्व अनुयायांसाठी अभिवादन स्थळ खुले करण्यात आले आहे.**

---

# थंडीत पेरू खा अन् शुगर नियंत्रणात ठेवा!

## थंडीत पेरू खाल्ल्याने मधुमेही रुग्णास फायदा होतो....

पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**चांगल्या आरोग्यासाठी प्रत्येकाने ज्या त्या हंगामात पिकणारी फळे खायलाच हवी. सध्या पेरूचा हंगाम आहे. पेरूतील जीवनसत्त्व क आणि इतर पौष्टिक घटकांमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते, तसेच शरीर सुदृढ व मजबूत होते. पेरू पाचक आणि नैसर्गिक रेचक म्हणून उत्तम कार्य करतो. थंडीत पेरू खाल्ल्याने मधुमेही रुग्णास फायदा होतो. पिंपरी-चिंचवड शहरात फ्रूट मार्केटमध्ये विविध प्रकारचे स्वादिस्ट पेरू विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**



बाजारात विविध प्रकारचे पेरू बाजारात पेरू विविध आकार, प्रकारात मिळतात.

सामान्यपणे पेरूच्या दोन जाती आहेत. एका जातीमध्ये पांढरा, तर दुसया जातीमध्ये गुलाबी गर असतो. दोन्हीही जातीचे पेरू चवीने गोड व थोडेसे तुरट असतात. आवळ्याच्या खालोखाल भरपूर प्रमाणात क जीवनसत्त्व देणारे फळ म्हणून पेरू ओळखला जातो.

नियमित पेरू खाणाऱ्या लोकांमध्ये लोहाची कमतरता निर्माण होत नाही. थंडीच्या बहरातील पेरू खाल्ल्यास रक्तातील साखर अर्थात ब्लडशुगर नियंत्रणात ठेवण्यासही मदत होते. तसेच बद्धकोष्ठतेच्या समस्येवर सकाळच्या वेळी उपाशीपोटी पिकलेला पेरू खाणे फायद्याचे ठरत असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

### रोगप्रतिकारशक्तीत वाढ

पेरू खाल्ल्यामुळे त्यातील जीवनसत्त्व 'अ' च्या माध्यमातून

### पेरूचा दर 40 रुपये

**पेरूमध्ये क जीवनसत्त्व असून, हे फळ बुद्धिवर्धक आहे. पेरू सेवनाने मानसिक थकवा दूर होऊन ऊर्जा प्राप्त होते. हिवाळ्यात पेरू हा ४० ते ५० रुपये किलोने मिळतो. त्यामुळे हे फळ कुणाही सर्वसामान्य नागरिकांना सहज उपलब्ध होऊ शकतो.**

### आरोग्यासाठी लाभदायक

**पेरू हे अत्यंत स्वस्त, पण आरोग्यासाठी फायदेशीर फळ आहे. पेरूमध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स म्हणजेच जीआय असतो, ज्यामुळे साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. पेरूमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, फोलेट, पोटॅशियम यांसारखे पोषक घटक आढळतात.**

---

# पिंपरी चौकातून बालकाचे अपहरण

## पोलिसांनी 23 तासांच्या आत मुलाला शोधले

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पिंपरी एका महिलेने ट्रॅफिक सिग्नलवर वस्तू विकणाऱ्या जोडप्याच्या मुलाचे अपहरण केले. पिंपरी पोलिसांनी 23 तासांच्या आत मुलाला शोधून त्याच्या पालकांच्या ताब्यात दिले. रवी सुनील पवार आणि त्यांची पत्नी राधा हे तीन वर्षांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथून कमाईसाठी पुण्यात आले. पवार दाम्पत्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात विविध वस्तूंची विक्री करतात. मंगळवारी (27 डिसेंबर) नेहमीप्रमाणे पवार दाम्पत्य त्यांच्या तीन मुलांसह वस्तू विकत होते.

दुपारी १.४५ च्या सुमारास पवार चौकातील झाडाच्या फांद्याजवळ मुलांना बसवून वडा-पाव घेण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांची पत्नी ट्रॅफिक सिग्नलवर सामान विकत होती. पवार दहा मिनिटांत परतले तेव्हा मुलगा राहुल तेथे नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. पवार दाम्पत्याने परिसरात शोध घेतला असता मुलगा सापडला नाही. त्यामुळे त्यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात धाव घेतली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक आवताडे यांनी घटनेचे गांभीर्य समजून गुन्हा दाखल केला. पिंपरी पोलीस, मानवी तस्करी विरोधी कक्ष, गुन्हे शाखा युनिट-2 यांच्या स्वतंत्र पथकांनी याप्रकरणी तपास सुरू केला.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये तोंडाला स्कार्फ बांधलेली एक महिला मुलाला घेऊन जाताना दिसत आहे. आरोपी महिलेचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी शंभरहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. बुधवारी (28 डिसेंबर) रात्री आरोपी महिलेने गहुंजेजवळील शिरगाव येथील प्रति शिर्डी साईबाबा मंदिरात मुलाला सोडून दिल्याची माहिती मिळाली. पिंपरी पोलिसांचे पथक शिरगावला गेले. मुलाला ताब्यात घेऊन तक्रारदाराच्या ताब्यात देण्यात आले. आरोपी महिलेचा शोध सुरू आहे.

## संपादकीय »

# मालवाहतुकीच्या मार्गाला ब्रेक

***एस. टी. महामंडळ समस्यांच्या गर्तेत सापडले आहे. या समस्या दिवसेंदिवस वाढताहेत. सर्वात जास्त नुकसान हे कोरोना काळात झाले. यावेळी प्रवासी वाहतूक बंद असल्याने महामंडळाला मोठा आर्थिक फटका बसला. त्यामुळे पर्यायी उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक होते.***

तेव्हाचे महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांच्या संकल्पेतून कोरोनाच्या पहिल्या लाटेत म्हणजे २० मे २०२०रोजी मालवाहतूक सुरू झाली. या पर्यायी योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. दिवसाला सरासरी २५ ते २८ लाख इतके उत्पन्न मिळत गेल्याने ही वाहतूक त्यावेळी अडचणीच्या काळात संजीवनी ठरली. मात्र त्यानंतर एसटीचा संप झाला आणि मालवाहतूकही बंद झाली. या योजनेला प्रतिसाद देणाऱ्या कंपन्या इतरत्र वळल्या. आधीच आर्थिक विवंचनेत असलेल्या एसटीच्या उत्पन्नाला ब्रेक लागला. याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या वेतनावर झाला. एसटीला आवश्यक सामानाचा पुरवठा करणाऱ्या अनेक कंपन्यांची देणी बाकी होती. एसटी स्थानकांची व इमारतींची दुरुस्तीही थांबली होती. त्यामुळे पर्यायी उत्पन्नाचा स्रोत निर्माण करून एसटीला वाचवणे आवश्यक होते.

कोविडकाळात वाहतूक बंद झाल्याने व्यवसाय कोलमडला व अनेक कंपन्या व सरकारी आस्थापना यांच्याकडून मिळालेला चांगला व्यवसाय दुसरीकडे गेला. खरेतर छोटे-मोठे व्यवसायिक व शासकीय गोदामातील माल हे एसटीच्या मालवाहतुकीकडे वळले होते. पण संप झाल्यामुळे त्यामध्ये सातत्य राखणे एसटीला न जमल्याने व अल्पावधीत मिळवलेली विश्वासाहर्ता गमावल्याने ही कामे हातातून कशी निसटली हे कळलेच नाही. संप मिटून बराच काळ लोटला तरी याकडे व्यावसायिक वळायला तयार नाहीत. सरकारनेही त्यांच्या गोडाऊनमधील काही मालवाहतूक एसटीला देण्याचा शब्द दिला होता. तो पुढे पाळला गेला नाही. अन्न व नागरी पुरवठा खात्याचे संपूर्ण काम या वाहतुकीला द्यायला हवे; पण ते झाले नाही. सध्या 'महाबीज' व 'बालभारती' या सरकारी आस्थापनाचे काम एसटीला मिळाले, तरी ते रीतसर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळाले आहे. त्यात सरकारची मेहेरबानी व मदत अजिबात नाही. फक्त पैसा आणि भौतिक सुखसोयी आपली जीवनशैली 'समृद्ध' करू शकत नाहीत. जिव्हाळ्याचे नातेसंबंध, कुटुंब, मित्र यांचंही जीवनात अनन्यसाधारण स्थान असतं.. ते जपावंच लागतं.

# शोक चिंता नको रे...






पाण्याची उपलब्धता नसल्याने पाणी साठवून ठेवायला पाठीवरचे कुबड, वाळवंटातल्या तापलेल्या वाळूतून चालता यावे यासाठी गादीसारखी जाड पावले हा त्याचाच भाग. त्याचसोबत साप, बेडूक, पक्षी, माकड, मासे यांसारख्या अजूनही विविध प्राण्यांच्या शरीरात आसपासच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी झालेल्या अनुकूलनाची ओळख झाली. मोठी होत गेले तसे लक्षात आले, की हे अनुकूलन फक्त प्राणी आणि शरीरापुरतेच मर्यादित नसते, तर माणसाच्या मनाशी, आनंदाशी आणि मनःशांतीशीही याचा फार जवळचा संबंध आहे. ते अनुकूलन आपल्याला रोजच्या आयुष्यात वरचेवर करावे लागते. आपण त्याला 'मानसिक लवचीकता' म्हणू शकतो.

बाहेरच्या परिस्थितीशी आपले विचार, भावना व कृती जुळवून घेणे म्हणजेच 'मानसिक लवचीकता.' मानसिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि आनंदी राहण्यासाठी मानसिक लवचीकतेची सवय आपल्याला खूप उपयोगी पडेल. आसपासचे वातावरण व परिस्थिती कशीही आली, तरी त्याला अनुसरून आपले विचार निवडणे, भावनांना हाताळणे आणि गरज असेल अशी कृती करणे हे आपल्यासाठी फायद्याचे आहे. याउलट मानसिक ताठरता म्हणजे परिस्थितीच्या मर्यादित शक्यतांनाच चिकटून राहणे आणि हट्टाने काही मर्यादित विचारांवर व कृतीवर अडून राहणे.

आपल्याकडे एक म्हण आहे, 'खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी.' याचा अर्थ सगळ्यांनाच माहीत आहे. ही म्हण लवचीकतेच्या अगदी विरूद्ध वागणुकीचे म्हणजेच मानसिक ताठरपणाचे उदाहरण आहे. या उदाहरणावरून स्पष्टच आहे, की लवचीक न राहिल्याने आपला तोटा होणार आहे. मग पानात पुरणपोळीसारखे पक्वान्न का असेना, तूप नसेल, तर उपाशी राहणे हे आपल्या फायद्याचं आहे का? तूप नाही, तर किमान पुरणपोळी तरी आहे, ती पोटभर खाता येईल हा विचार करणं व पोटभर पुरणपोळीचे जेवण जेवणे हे आपल्या फायद्याचे आहे?

अशाच प्रकारचे प्रसंग व व्यक्ती आपल्या अपेक्षेपेक्षा वेगळ्या वा नव्या पद्धतीने समोर आल्या, तर वेगळ्या दृष्टिकोनातून परिस्थिती पाहणे किंवा नेहमीपेक्षा, अपेक्षेपेक्षा वेगळ्या प्रतिसादाच्या शक्यतांना जागा देणे हे लवचीकता आपल्याला शिकवते. त्याचे फायदे आपल्या रोजच्या आयुष्यापासून ते आयुष्यातल्या मोठ्या निर्णय व घडामोडींच्या वेळीही अनुभवायला मिळतात. उदाहरणार्थ, सकाळी ऑफिसला जायची घाई आहे आणि गाडीच सुरू होईना, उन्हाळ्यात ताजी भाजी मिळत नाही, जी होती ती संपली आणि पटकन मुलांचा डबा करायचा आहे, मीटिंगला क्लाएंट एक तास उशीरा आला, अगदी नक्की मिळेल अशी ऑर्डर ऐन वेळी रद्द झाली, लग्नाचा निर्णय घेताना जोडीदाराने काही नव्या अटी घातल्या, ही आणि अशी असंख्य उदाहरणे देता येतील. अशा प्रसंगी तुमची प्रतिक्रिया काय येते आठवून पाहा. कधी लगेच दुसरा मार्ग शोधता, तर कधी चिडचिड, तर कधी भांडणे वा वादही होतात ना? कधी निराश वाटते, तर कधी स्वत:लाच दोष देतो.एखादी गोष्ट ही या एकाच प्रकारे घडली पाहिजे, या हट्टापोटी नकारात्मक भावना व मानसिक ताण जन्माला येतो. नात्यांमध्येही समोरच्याचे वागणे, बोलणे आपल्याला आवडले नाही, कुणाची मते पटली नाही, तरी तिथे मानसिक लवचीकता आपल्याला होणारा त्रास वाचवू शकेल. असेच केले पाहिजे किंवा अमुक एक गोष्ट केलीच पाहिजे, नाही तर काही खरे नाही, हा झाला हट्ट वा मानसिक ताठरपणा. अमुक एक गोष्टी केली गेली, तर उत्तम; पण ती नाही केली, तरी मी ठीक आहे. दुसरा काही तरी मार्ग मी काढू शकतो ही झाली लवचीकता. 'च' हा हट्ट वा ताठरपणाला ओळखण्यासाठीची एक खूण म्हणून लक्षात ठेवू. आपल्याला आपल्या विचारप्रक्रियेतून 'च' ला पूर्णपणे काढून टाकायचे आहे हे मनाशी पक्के करा. हा 'च' अनेक नकारात्मक भावनांचे, ताणाचे; तसेच नाती दुखावण्याचेही कारण बनतो.आपण रोजच्या आयुष्यात कुठे अवलंब करू शकतो या मानसिक लवचीकतेचा?

तर जिथे जिथे आपली वारंवार चिडचिड होते किंवा व्यक्ती वा प्रसंग वा परिस्थिती आपल्याला सतत निराश करतात तिथे.

# लाख दुखों की एक दवा, इथेनॉल!

**आपल्याकडे मिश्रित पेट्रोलचे धोरण चांगले आहे. इथेनॉलचे परिणाम गॅस किट, रबर पार्ट, ॲल्युमिनिअम पार्ट्स अशा काही इंजिनावर व्हायचे. पण आता उत्पादकांनी हे जुने पार्ट काढून टाकले.**

आताच्या इंजिनाला इथेनॉल मारक किंवा बाधक नाही. इथेनॉलमध्ये वेग वाढवण्याची ताकद आहे. त्यामुळे जास्त वेगाने जाण्यासाठी इथेनॉल वापरावे. रेसिंग गाडय़ांमध्ये मिथेनॉल वापरले जाते. वाहनोद्योगात इथेनॉल किंवा मिथेनॉल ही स्वागतार्ह गोष्ट आहे. गडकरी यांचे स्तुत्य धोरण आपण सर्वांनी स्वीकारलेले आहे, ही फार चांगली गोष्ट आहे. ज्या जमिनीवर मका किंवा ऊस लावला जातो, ती जमीन अन्नधान्यासाठी वापरायची की इंधनासाठी वापरायची हा आक्षेप असला, तरी आपल्याला थोडा विचार करणे आवश्यक आहे. स्वयंपूर्ण होण्यासाठी इथेनॉल निर्मिती करणे गरजेचे आहे. साखर कारखान्यांचे उपउत्पादन म्हणून आपण इथेनॉल निर्मिती करतो. त्यामुळे कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते. त्यापलीकडे जाऊन एक उपाय म्हणजे भाताच्या तुकडय़ांपासून इथेनॉल तयार करता येते.

वाया जाणाऱ्या पदार्थापासून इथेनॉल केल्यास कुणाचा आक्षेप नाही.



पण इथेनॉलसाठी चांगली सुपीक जमीन वापरायची, पाणी घालायचे आणि अन्नधान्याऐवजी इथेनॉल करण्यावर लोकांचा आक्षेप आहे. तो रास्तही आहे. पण पडीक जमिनीवर बांबू लावल्यास बांबूपासून इथेनॉल तयार करता येते. लातूरच्या शेतकऱ्यांच्या गटाने असा प्रयोग केलेला आहे. त्यासाठी इंडियन इन्स्टिटय़ूट ऑफ सायन्सने तंत्रज्ञान दिले, हैदराबादच्या एका संस्थेने तिथे कारखाना सुरू करायचे ठरवले आहे. पडीक जमिनीवर बांबू लावून इथेनॉल केल्यास ते अधिक चांगले होईल. वाइन, बीयर, व्होडका, रम यासाठीही इथेनॉल वापरले जाते. चांगल्या दर्जाचे इथेनॉल तयार करून जगभरात निर्यातीकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या इथेनॉलची किंमत जगातल्या इथेनॉलच्या किमतीच्या तोडीला आली पाहिजे. इथेनॉलचे कारखाने योग्य क्षमतेचे, योग्य तंत्रज्ञानाचे केले पाहिजेत. पंजाब, हरियाणातील शेतकऱ्यांनी टाकाऊ शेतमाल जाळण्यापेक्षा त्यातून इथेनॉल निर्मिती केल्यास त्यांचे उत्पन्नही वाढेल. हा टाकाऊ शेतमाल रेल्वे किंवा ट्रकद्वारे इथेनॉलच्या कारखान्यात पाठवल्यास इथेनॉल निर्मितीचा विचार केला पाहिजे.

9दिल्लीतील प्रदूषणावर हा चांगला उपाय आहे. इथेनॉल हे जैवतंत्रज्ञानाला पूरक आहे. कोरफडीपासूनही ते करता येत असल्याचे ऐकले आहे. वाळवंटातही इथेनॉल करता येईल. इथेनॉल हे लाख दुखों की एक दवा आहे. भारतही आता इथेनॉलची निर्मिती करत आहे. आपल्याकडे मिश्रित पेट्रोल असते. अमेरिकेत मिश्रित पेट्रोल थोडे स्वस्त विकले जाते. त्याचे मायलेज कमी असते. पण सध्याच्या महागाईच्या दिवसांत स्वस्त म्हणून चालेल असे म्हटले जाते. पण भारतात तसे काही नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# इगतपुरी : कंपनीला भीषण आग!

## अनेक कामगार अडकल्याची भीती; मदत आणि बचाव कार्य सुरू

। नाशिक । महाईन्यूज ।

**नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील (IGATPURI) कंपनीला भीषण आग लागली आहे. ही आग प्रचंड असून परिसरात धुराचे लोट उसळले आहेत. जिंदाल पॉलिफिल्म्स या कंपनीला आग लागली असल्याची प्राथमिक माहिती आहे. आगीत काही कामगार जखमी झाल्याचे वृत्त आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी ही घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.**



इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव जवळ असलेल्या जिंदाल पॉलिफिल्म्स या कंपनीला आग लागल्यानंतर मोठे स्फोट ऐकू आले. कंपनीत असलेल्या रसायनांचा स्फोट झाला असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. काहींच्या मते हा स्फोट बॉयलरचा झाला असल्याचे सांगण्यात येते. आगीचे नेमकं कारण अद्यापही स्पष्ट झाले नाही. आग भीषण असून प्रचंड धुराचे लोट उसळले आहे. महामार्गावरूनदेखील या आगीच्या धुराचे लोट दिसत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या कंपनीत एक हजारांहून अधिक कामगार काम करतात. यामध्ये महिलांचाही समावेश आहे. सकाळी 11.30 वाजण्याच्या सुमारास मोठा स्फोट झाला. स्फोटाच्या आवाजाने परिसरात एकच खळबळ उडाली. कंपनीत अडकलेल्या कामगारांची सुटका करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आगीची माहिती समजताच अग्निशमन दल आणि पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कंपनीतील केमिकल स्टोरेजला आग लागली आहे. या आगीत काही जण जखमी झाले आहेत. 11 जणांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यातील काही जणांची प्रकृती गंभीर आहे. आगीत कितीजण अडकले याबाबत नेमका आकडा समोर आला नाही. सध्या अग्निशमन दलाचे आठ बंब आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. घटनास्थळी रुग्णवाहिकादेखील दाखल झाल्या आहेत. आगीची माहिती मिळताच नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक, विभागीय महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी आणि इतर अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत.

### मृतांच्या वारसांना प्रत्येकी 5 लाखाची मदत - मुख्यमंत्री



नाशिकच्या इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव परिसरात झालेल्या भीषण आगीत जखमी झालेल्या दोघा महिलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दोन्ही मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पाच लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव परिसरात असलेल्या जिंदाल कंपनीत आग सकाळी स्फोट होऊन भीषण आग लागली. आगीची दाहकता एवढी एवढी होती की, परिसरातील गावावरून हे आगीचे लोळ दिसत होते. या घटनेत सुरवातीला 14 जखमी कामगारांना नाशिकच्या विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान नाशिकच्या ट्रामा सेंटर चार जखमींना दाखल करण्यात आले होते. यातील दोघा महिलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. महिमा आणि अंजली अशी दोघा मृत महिला कर्मचाऱ्यांची नावे आहेत.दरम्यान घटनेची माहीती मिळाल्यानंतर औरंगाबाद येथे कृषी महोत्सवाच्या कार्यक्रमात असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तात्काळ इगतपुरीला रवाना झाले असून ते नाशिकमधील जखमी रुग्णांची विचारपूस करत आहेत. दरम्यान मृत महिलांच्या वारसांना पाच लाखांची मदत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली आहे. तर जखमींवर योग्य उपचार होतील, त्याचबरोबर जखमींची सर्व खर्च सरकार करेल असे आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

# भाजपाने उडवली ठाकरे गटाची खिल्ली!

## व्यंगचित्रात शरद पवारांना ज्योतिषी दाखवत उद्धव ठाकरेंकडून वदवला 'हा' प्रश्न

। मुंबई । महाईन्यूज ।

महाविकास आघाडी सरकार हा महाराष्ट्रातला न भुतो न भविष्यती असा प्रयोग होता. कारण काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे तीन पक्ष कधी एकत्र येतील असं कुणालाही वाटलं नव्हतं. हा प्रयोग जसा अनपेक्षित होता तेवढंच किंवा कांकणभर जास्तच महाराष्ट्रात घडलेलं सत्तांतर होतं. शिवसेनेत बंड होईल इतका मोठा गट फुटून भाजपासोबत जाईल असं कुणालाही वाटलं नव्हतं. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना भाजपवर टीकेची एकही संधी सोडली नव्हती. तसंच मुख्यमंत्रीपद गेल्यानंतरही ते सातत्याने भाजपवर टीका करत आहेत. भाजपने याला टोमणे बॉम्ब असं नाव दिलं आहे. हाच संदर्भ घेत नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी भाजपा महाराष्ट्र या ट्विटर अकाऊंटवर एक व्यंगचित्र पोस्ट करण्यात आलं आहे. यात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची खिल्ली उडवण्यात आली आहे.



शिवसेना दुभंगल्यावर पडले दोन गट

**महाराष्ट्रात शिवसेना पक्ष फुटल्यानंतर हा पक्ष दोन गटांमध्ये विभागला गेला आहे. एक आहे शिंदे गट म्हणजेच बाळासाहेबांची शिवसेना आणि दुसरा आहे ठाकरे गट म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे. या दोन्ही गटांमधून सध्या विस्तव जात नाही. एकनाथ शिंदे यांनी हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी केलेले भाषणही हेच दाखवून देणारं ठरलं. आता भाजपाने नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी व्यंगचित्र पोस्ट करून संजय राऊत, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंची खिल्ली उडवली आहे. याला ठाकरे गटाकडून किंवा शरद पवारांकडून काही उत्तर दिलं जाणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.**

भाजपा महाराष्ट्राने एक व्यंगचित्र पोस्ट केलं आहे. या व्यंगचित्रात शरद पवार यांना ज्योतिषी दाखवण्यात आलं आहे.त्यांच्या नावाची पाटी बारामतीकर ज्योतिष अशी दाखवण्यात आली आहे. २०२३ चं भविष्य सांगायला ते झाडाखाली बसले आहेत. शरद पवारांना व्यंगचित्रात ज्योतिषी दाखवण्यात आलं असून संजय राऊत यांना पोपटाच्या रूपात दाखवण्यात आलं आहे. तर उद्धव ठाकरे त्यांच्याकडे हात दाखवत विचारत आहेत की या वर्षात माझे टोमणे बॉम्ब चालतील का?आत्तापर्यंत अनेकदा उद्धव ठाकरेंनी भाजपावर टीका केली आहे. तसंच देवेंद्र फडणवीस यांनी आधी विरोधी पक्षनेते असताना आणि त्यानंतर उपमुख्यमंत्री झाल्यावर उद्धव ठाकरेंच्या टीकेला टोमणे बॉम्ब असं नाव दिलं आहे. दसरा मेळाव्यातल्या उद्धव ठाकरेंच्या भाषणाविषयीही अशीच प्रतिक्रिया भाजपाने दिली आहे. अशात आता नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी पोस्ट करण्यात आलेलं हे व्यंगचित्र सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरतं आहे.

२०१९ ची विधानसभा निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी महायुती म्हणून लढवली होती. या निवडणूक निकालात भाजपाचे १०५ तर शिवसेनेचे ५६ आमदार निवडून आले होते. त्यानंतर मुख्यमंत्रीपद अडीच-अडीच वर्षे वाटून घेण्याबद्दल या दोन्ही पक्षांचा वाद झाला तो विकोपाला गेला आणि युती तुटली. त्यानंतर महाविकास आघाडी स्थापन झाली आणि ते सरकार अडीच वर्षे चाललं. भाजपने जून महिन्यात झालेल्या विधान परिषद निवडणुकीनंतर ऑपरेशन लोटस राबवत महाविकास आघाडीला सुरुंग लावला. त्यानंतर ३० जूनला भाजपाच्या पाठिंब्यावर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले आणि देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले.

# रोजगार: नव्या वर्षात मोठं आव्हान!

## डिसेंबरमध्ये बेरोजगारीचा दर वाढला, 16 महिन्यांतील उच्चांक

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आज आपण नवीन वर्षाचं स्वागत केलं. सर्वत्र नव्या वर्षाचा उत्साह पाहायला मिळाला. अनेकांनी नवनवीन संकल्प केले. काहींनी नवीन वर्षातील आव्हानांवर देखील चर्चा केली. निश्चितपणे नवीन वर्षात देशासमोर अनेक आव्हाने असतील. यामध्ये वाढत्या बेरोजगारीच्या दरावर (Unemployment Rate India) नियंत्रण ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान असणार आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (CMIE) ने बेरोजगारीबाबत काही आकडेवारी जाहीर केली आहे. त्या आकडेवारीनुसार, भारतातील बेरोजगारीचा दर डिसेंबर 2022 मध्ये 8.3% पर्यंत वाढला आहे, जो गेल्या 16 महिन्यांतील सर्वोच्च आहे. CMIE च्या आकडेवारीनुसार देशातील शहरी बेरोजगारीचा दर डिसेंबरमध्ये 8.96% वरून 10.09% पर्यंत वाढला आहे, तर ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर 7.55% वरून 7.44% वर आला आहे.

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीचे व्यवस्थापकीय संचालक महेश व्यास यांनी याबद्दल बोलताना सांगितले की, आपल्या देशात बेरोजगारीचा दर वाढत आहे, जरी हा दर वाढलेला दिसत असला तरी तो तितका वाईट नाही, कारण कामगार भागिदारीच्या दरामध्ये (labour participation rate) चांगली वाढ झाली आहे. जी 2014 मध्ये 40.48 टक्के झाली आहे. डिसेंबरमध्ये हा गेल्या 12 महिन्यांतील उच्चांक आहे.

### हरियाणात सर्वाधिक बेरोजगारी दर

डिसेंबरमध्ये बेरोजगारीचा दर हरियाणामध्ये 37.4% पर्यंत वाढला, त्यानंतर राजस्थान 28.5% आणि दिल्ली 20.8% वर पोहोचला आहे, हे CMIE च्या आकडेवारीवरून स्पष्ट झालं आहे.

येत्या 2024 मधील लोकसभा निवडणुकांपूर्वी देशातील महागाई रोखणे आणि रोजगार मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या लाखो तरुणांसाठी रोजगार निर्माण करणे हे मोदी सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान असल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. येत्या निवडणुकांमध्ये बेरोजगारीचा मुद्दा महत्वाचा ठरणार आहे. मोदी सरकारला या आव्हानाचा सामना या निवडणुकांमध्ये करावा लागणार आहे. काँग्रेसकडून राहुल गांधी काढलेल्या भारत जोडो यात्रेमध्ये देखील बेरोजगारीच्या मुद्द्यावर अनेकदा भाष्य केलं होतं.

### नव्या वर्षात सर्वात मोठे आव्हान रोजगार निर्मितीचे

महेश व्यास यांनी म्हटलं आहे की, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डिसेंबरमध्ये देशातील रोजगाराचा दर 37.1% इतका वाढला आहे, जो जानेवारी 2022 नंतरचा उच्चांक होता.

### जुलै-सप्टेंबर तिमाहीत दर कमी करण्यात आला

नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिस (NSO) द्वारे संकलित केलेल्या आणि नोव्हेंबरमध्ये जारी केलेल्या त्रैमासिक आकडेवारीनुसार, जुलै-सप्टेंबर या तिमाहीत बेरोजगारीचा दर 7.2% पर्यंत घसरला आहे, जो मागील तिमाहीत 7.6% होता.



# आंध्र प्रदेशमध्ये चंद्राबाबू नायडूंच्या सभेत पुन्हा चेंगराचेंगरी

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आंध्र प्रदेशमधील गुंटूर जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री आणि टीडीपी प्रमुख चंद्राबाबू नायडू यांच्या जाहीर सभेत पुन्हा एकदा चेंगराचेंगरी झाली. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत. काही दिवसांपूर्वीच नायडू यांच्या जाहीर सभेदरम्यान नेल्लोरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत ८ जणांचा मृत्यू झाला होता. मात्र, आता चंद्राबाबू नायडू यांच्या रोड शोमध्ये दुसऱ्यांदा चेंगराचेंगरी झाल्याची माहिती समोर आली आहे.

नायडू जाहीर सभेतून निघाल्यानंतर ही चेंगराचेंगरी झाली. जखमींना जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. टीडीपीने रेशन किट वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये मोठ्या संख्येने लोक आले होते.

### 3 जणांचा मृत्यू



यापूर्वी, २८ डिसेंबर रोजी आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्ह्यातील कंदुकूर येथे टीडीपीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात चेंगराचेंगरी झाली होती. तसेच ८ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. नायडू यांनी या घटनेनंतर त्यांची बैठक रद्द केली होती आणि प्राण गमावलेल्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. याशिवाय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मृतांच्या कुटुंबियांना भरपाई जाहीर केली होती. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी मृतांच्या नातेवाईकांना २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली होती.

# नववर्षाच्या सुरुवातीला, दिल्लीत भूकंपाचे धक्के

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

संपूर्ण जगभरात सरत्या वर्षाला निरोप देत नव्या 2023 वर्षाचं सेलिब्रेशन सुरु असताना आज पहाटे दिल्ली आणि आसपासच्या परिसरात भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले आहेत. वर्षाच्या पहिल्याचं दिवशी जाणवलेल्या भूकंपामुळे दिल्लीकरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र यात कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. मध्यरात्री 1 वाजून 19 मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. हरियाणाच्या इज्जर येथे भूकंपाचं केंद्र होते.

या भूकंपाची तीव्रता 3.8 रिश्टर स्केल एवढी नोंदवण्यात आली, तसेच त्याची खोली जमिनीपासून 5 किलोमीटर आत होती, अशी माहिती नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने दिली आहे.अचानक जाणवलेल्या या भूकंपाचे धक्क्यामुळे अनेकांनी घरातून आणि हॉटेलमधून पळ काढत रस्त्यावर धाव घेतली. काही काळ हे नागरिक बाहेरचं थांबले, मात्र भूकंपाचा धोका टळल्याचे लक्षात येताच नागरिक पुन्हा आपल्या घरी आणि हॉटेलात गेले.त्यानंतर काही काळ हे नागरिक बाहेरच थांबले होते. मात्र, भूकंपाचा धोका टळल्याचं लक्षात आल्यानंतर पुन्हा एकदा नागरीक आपल्या घरात आणि हॉटेलात गेले. 2023 या नवं वर्षाच्या सेलिब्रेशनमध्ये व्यस्त असताना अचानक आलेल्या या भूकंपामुळे नागरिक दहशतीखाली होते.



# सोनाली कुलकर्णीनं गुडन्यूज देऊन केलं नवं वर्षाचं स्वागत;

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी (SONALEE KULKARNI) ही तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. मराठी चित्रपटसृष्टीतील अप्सरा असं सोनालीला म्हटलं जातं. सोनाली तिच्या नृत्यशैलीनं आणि अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. आता सोनालीनं तिच्या चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे. सोनालीनं एक खास पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली. सोनालीनं मराठीबरोबरच हिंदी चित्रपटांमध्ये देखील काम केलं आहे. आता सोनाली मल्याळम भाषेतील चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाची माहिती सोनालीनं सोशल मीडियावर दिली. सोनालीनं तिच्या मलईकोट्टई वलीबन या मल्याळम भाषेतील आगामी चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर शेअर केलं. या पोस्टरला तिनं कॅप्शन दिलं, 'नवीन वर्ष, नवी यात्रा, नवा प्रदेश माझे हे वर्ष खरेखरच आशादायक दिसत आहे. मला मला अलौकिक बुद्धिमत्ता असणाऱ्या लिजो जोस पेलिसरी यांच्या मलईकोट्टई वलीबन (MALAIKOTTAI VALIBAN) या मल्याळम चित्रपटामध्ये काम करण्याची संधी मिळत आहे.' मलईकोट्टई वलीबन या चित्रपटात प्रसिद्ध अभिनेते मोहनलाल यांच्यासोबत सोनाली काम करणार आहे. अनेक नेटकऱ्यांनी सोनालीच्या या पोस्टला कमेंट करुन तिला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच प्रार्थना बेहेरे, सिद्धार्थ जाधव, संजय जाधव या सेलिब्रिटींनी देखील सोनालीच्या या पोस्टला कमेंट करुन तिला शुभेच्छा दिल्या.

# 'करिअरच्या शिखरावर असताना मुलीला जन्म देण्याचा निर्णय घेणं म्हणजे..' आलिया भट्ट



आलिया भट्ट ही बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. गेले वर्ष तिच्यासाठी खूप खास होते. तिने केवळ बॉयफ्रेंड रणबीर कपूरसोबत लग्नच केले नाही तर ती पहिल्यांदा आईही बनली आहे. आलिया भट्टने नोव्हेंबरमध्ये मुलीला जन्म दिला. आलिया भट्टने लग्न करून लगेच आई होण्याचा निर्णय घेतला तेव्हा जो तो ते कळल्यावर हैराण झाला होता. करिअरच्या शिखरावर असताना अभिनेत्रीचा हा निर्णय सगळ्यांसाठीच शॉकिंग होता.सहसा बॉलिवूड अभिनेत्री त्यांच्या करिअरच्या शिखरावर असताना लग्न करणे टाळतात. याबाबत प्रत्येकाची धारणा वेगळी असते. आलिया भट्टने नुकतीच एका इंग्रजी वेबसाईटला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने चित्रपट कारकिर्दी व्यतिरिक्त वैयक्तिक आयुष्याविषयी देखील मनमोकळा संवाद साधला. यादरम्यान आलिया भट्टला विचारण्यात आले की, 'तिने करिअरच्या शिखरावर असताना लग्नाची घाई का केली आणि आई होण्याचा निर्णय इतक्या लवकर का घेतला?' यावर आलिया म्हणाली, "होय, करिअरच्या शिखरावर पोहोचल्यानंतर मी लग्न करून आई होण्याचा निर्णय घेतला. पण लग्न करून किंवा आई झाल्यावर माझ्या कामावर त्याचा परिणाम होईल असे कोणाला वाटते? आणि तसं झालं तरी मला त्याची पर्वा नाही. एक कलाकार म्हणून माझा स्वतःवर विश्वास आहे. तुम्ही मेहनत केलीत, आणि चांगले कलाकार असाल तर तुम्हाला काम मिळेल. शेवटी हा तुमचा वैयक्तिक प्रश्न असतो तुम्हाला कधी काय करायचे आहे". याशिवाय आलिया भट्टने इतरही अनेक गोष्टी केल्या आहेत.

# बॉलिवूडची 'शेरनी' आहे कोट्यवधींची मालकीण



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री विद्या बालनचा (VIDYA BALAN) आज 44 वा वाढदिवस आहे. विद्यानं अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केलं. तिच्या साडी लूकला अनेकांची पसंती मिळते. साडी आणि विद्याचं खास नातं आहे. कोणत्याही पार्टीला किंवा पुरस्कार सोहळ्याला विद्या ही तिच्या साडी लूकमध्ये हजेरी लावते. विद्या तिच्या अभिनयानं नेहमीच प्रेक्षकांची मनं जिंकते. जाणून घेऊयात विद्याचे चित्रपट आणि तिच्या संपत्तीबाबत....

विद्याचे चित्रपट

विद्याचा जन्म 1 जानेवारी 1978 रोजी झाला. विद्यानं मुंबईमध्ये एन्थोनी गर्ल्स स्कूलमध्ये शिक्षण घेतले. तिने 2005 मध्ये प्रदर्शित झालेल्या परिणीता या चित्रपटामधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. या चित्रपटात विद्यानं ललिताची भूमिका साकारली होती. याशिवाय तिने द डर्टी पिक्चरमध्ये सिल्कची भूमिका साकारली होती. या चित्रपटातील विद्याच्या अभिनयाचं सर्वसामान्य प्रेक्षकांसोबतच समीक्षकांनीही कौतुक केलं. शेरनी या चित्रपटामध्ये विद्या बालनने प्रमुख भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये विद्या फॉरेस्ट ऑफिसरच्या भूमिकेत दिसली होती. या चित्रपटाचे कथानक मानव आणि प्राणी यांच्यावर अधारित आहे. हा चित्रपट ओटीटी प्लॅटफोर्मवर प्रदर्शित झाला होता. लगे रहो मुन्नाभाई, तुम्हारी सुल्लू आणि बेगम जान या चित्रपटामधील विद्याच्या अभिनयाचं देखील अनेकांनी केलं.

विद्याची संपत्ती

विद्या जवळपास 134 कोटी संपत्तीची मालकीण आहे. तिच्याकडे 14 कोटींचे अपार्टमेंट देखील आहे. विद्याकडे मर्सिडीज-बेंजसारख्या आलिशान गाड्या देखील आहेत.

# शाहरुख खानची ऑन स्क्रिन मुलगी अंजलीचा साखरपुडा

'कुछ कुछ होता है' चित्रपटात शाहरुख खानची मुलगी अंजलीची भूमिका साकारून सना सईद रातोरात स्टार बनली. सनाने या चित्रपटात काम केले तेव्हा ती खूपच लहान होती. असे असूनही सनाने शाहरुखच्या चित्रपटात चांगला अभिनय केला आहे.

सना सईद आता मोठी झाली आहे. यासोबतच क्यूट दिसणारी अंजली आता खूपच ग्लॅमरसही झाली आहे. दरम्यान, नववर्षानिमित्त सना सईदने तिच्या चाहत्यांना एक खास भेट दिली आहे. सना सईदने बॉयफ्रेंड सबा वॉर्नरसोबत एंगेजमेंट केली.



सना सईद आणि सबा वॉर्नरने त्यांचे इंस्टाग्राम अकाउंट एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये सबा वॉर्नर सनाला गुडघ्यावर बसून प्रपोज करताना दिसत आहे. सबाची ही स्टाईल पाहून सनाचा आनंद सातव्या गगनाला भिडतो. या क्लिपमध्ये सना आणि सबा एकमेकांवर प्रेमाचा वर्षाव करत आहेत. कधी ते एकमेकांना किस करत आहेत तर कधी सना तिची एंगेजमेंट रिंग फ्लॉंट करताना दिसत आहे.

## टीम इंडिया 2023 मध्ये

# मोठ्या स्पर्धांना करणार लक्ष्य!

### 2023 हे वर्ष भारतीय संघाच्या दृष्टीने खूप महत्वाचे ठरणार

**। नवी दिल्ली ।**

**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाने गेल्या वर्षामध्ये बरेच चढ-उतार पाहिले आहेत. २०२२ मध्ये, टीम इंडियामध्ये कर्णधारपदापासून निवड समितीपर्यंत बदल करण्यात आले आहेत. गतवर्षी आशिया चषक आणि टी-२० विश्वचषक स्पर्धेत संघाची कामगिरी खराब राहिली होती. २०२३ मध्ये भारतीय क्रिकेट टीम एका वेगळ्या रुपात मैदानात उतरणार आहे. टीम इंडिया नवीन वर्षात दोन मोठ्या आयसीसी स्पर्धांना टार्गेट करणार आहे.



#### 1.वेग-वेगळे कर्णधार –

भारतीय संघ २०२३ मध्ये प्रथम टी-२० क्रिकेटमध्ये नवीन कर्णधाराची नियुक्ती करेल. बीसीसीआयने श्रीलंकेविरुद्धच्या टी-20 मालिकेत याचे संकेत दिले आहेत. कारण या मालिकेत हार्दिक पांड्या नेतृत्व करणार आहे. त्याच वेळी, बीसीसीआय टी-२० विश्वचषक २०२४ च्या दृष्टीने संघ बांधणीवर जोर देता दिसेल. बीसीसीआय टी-२० संघाचे कर्णधारपद हार्दिक पांड्याकडे सोपवू शकते. मात्र, बीसीसीआयने याला अधिकृत दुजोरा दिलेला नाही. मात्र हार्दिक पांड्यालाच कर्णधार बनवले जाईल असे मानले जात आहे. तर सूर्यकुमार यादवकडे उपकर्णधारपद सोपवण्यात आले आहे. तर रोहित शर्मा कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांचे नेतृत्व करणार आहे.

#### 2. बीसीसीआय स्प्लिट कोचिंग सुरु करु शकते–

ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषक २०२२ मध्ये भारताला उपांत्य फेरीत इंग्लंडविरुद्ध १० गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर बांगलादेशविरुद्धच्या वनडे मालिकेतही २-१ ने मालिका गमवावी लागली. तेव्हापासून तिन्ही फॉरमॅटमध्ये स्वतंत्र कर्णधारासारखे वेगळे प्रशिक्षक नियुक्त केले जावे, अशी चर्चा आहे. माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगने या गोष्टीचे समर्थन केले. त्याच वेळी, बीसीसीआय २०२३ मध्ये प्रशिक्षकांचे विभाजन करू शकते. इंग्लंड संघाने हे केले आणि त्यांच्या खेळात बरेच बदल झाले आहेत. त्यामुळे बीसीसीआय देखील त्याचा वापर करण्याचाही विचार करू शकते.

#### 3. बॉर्डर गावसकर ट्रॉफी –

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ९ फेब्रुवारीपासून ४ सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. ऑस्ट्रेलियाने शेवटचा भारत दौरा २०१६ मध्ये केला होता. त्या काळात ही मालिका खूपच रोमांचक होती. भारताने ही मालिका २-१ ने जिंकली. आणि यावेळी २०२३ मध्ये भारताला पुन्हा एकदा बॉर्डर गावस्कर ट्रॉफी जिंकायची आहे.

#### 4.जागतिक कसोटी चॅम्पियनशिप–

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलला आता थोडाच वेळ शिल्लक आहे. त्याचवेळी, भारतीय संघाने बांगलादेशविरुद्धची दोन कसोटी सामन्यांची मालिका २-० ने जिंकली आणि जागतिक कसोटी चॅम्पियनशिप टेबलमध्ये ते दुसरे स्थान मिळवले. त्याचवेळी, ऑस्ट्रेलिया संघ वेस्ट इंडिज आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर विजय मिळवून गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

#### 5.आशिया कप 2023 –

आशिया चषक २०२२ चे विजेतेपद श्रीलंकेने जिंकले होते. त्यादरम्यान भारतीय संघाने अत्यंत खराब कामगिरी केली होती. ग्रुप स्टेजमध्येच भारताला पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्याच वेळी, २०२३ मध्ये, आशिया कप सप्टेंबरमध्ये सुरू होणार आहे. मात्र, यावेळी पाकिस्तान त्याचे यजमानपद भूषवणार आहे.

---

# उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देण्याचा प्रयत्न: सौरभ राव

### म्हाळुंगे येथे 2 ते 12 जानेवारी दरम्यान महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**पुणे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंना अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळावी, यासाठी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी-म्हाळुंगे येथे २ ते १२ जानेवारी दरम्यान महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे औपचारिक उद्‌घाटन पाच जानेवारी रोजी होणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिली. येथील विधानभवन सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. क्रीडा आयुक्त सुहास दिवसे, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे सचिव नामदेव शिरगावकर, क्रीडा सहसंचालक



चंद्रकांत कांबळे, उपसंचालक संजय सबनीस आदी या वेळी उपस्थित होते.

राव म्हणाले, राज्य सरकार आणि महाराष्ट्र ऑलिंपिक संघटना यांच्या वतीने या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धेत १८ वर्षांवरील वयोगटातील खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या निमित्ताने राज्यातील खेळाडूंना अधिकाधिक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. खेळाडूंमधील क्रीडा कौशल्य वाढीस लागण्यास मदत होईल. स्पर्धेचे आयोजन राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये करण्यात येत असून, या स्पर्धेत ३९ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. राज्यातील १० हजार ४५६ खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक आणि व्यवस्थापक या स्पर्धेत सहभागी होत आहेत. या स्पर्धेसाठी राज्य सरकारने १९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पाच जानेवारीला श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे होणार आहे. या समारंभास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, क्रीडामंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

दिवसे म्हणाले, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. अशा खेळाडूंच्या गुणवत्तेला स्पर्धेद्वारे चांगली संधी मिळेल. खेळाडूंची माहिती सॉफ्टवेअरद्वारे संकलित करण्यात येणार आहे.